## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १६७७/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.जगन्नाथ नारायण पाटील,
मसोली-पाटीलपाडा पा.डहाणू रोड,
ता.डहाणू, जि.पालघर ४०१ ६०२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (जंकास) ठाणे, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे कार्यालय, मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे पूर्व जि.ठाणे ४०० ६०३.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (जंकास) ठाणे, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे कार्यालय, मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे पूर्व जि.ठाणे ४०० ६०३.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक डहाणू यांचे कार्यालय, डहाणू आगार रोड, डहाणू, ता.डहाणू , जि.पालघर ४०१ ६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक डहाणू यांचे कार्यालय, डहाणू आगार रोड, डहाणू, ता.डहाणू , जि.पालघर ४०१ ६०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ३/१२/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २५/३/२०२१ | ---- | २५/६/२०२१ | १४/७/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१२/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३/१२/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता ऑनलाइन उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती प्रिती बेलकर लेखापाल, उप वनसंरक्षक डहाणू कार्यालय यांचे प्रतिनिधी श्री.आवेश धारे, लेखापाल व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदीश भांगे, वनपरिक्षेत्र अधिकारी जं.का.स ठाणे, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालय उपस्थित आणि तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती प्रतिक्षा किशोर नवले, वन सांख्यिक (अ.का. वनपरिक्षेत्र अधिकारी जं.का.स ठाणे), मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालय अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम २२अ अंतर्गत दि.२०/१०/१९८० नंतर सक्षम या निकाली यांचे आदेश, महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ सुधारीत १९७८ मधील कलम ६ व २२अ नुसार काढलेल्या आदेशाची प्रत शासनाकडून मान्यता प्राप्त करणेच्या प्रस्तावाची संचिका"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१४/७/२०२१ रोजी, "*अर्जदार यांनी मागितलेला दस्ताऐवजाची नस्ती अभिलेखामध्ये असणे अपेक्षित आहे. तरी पुनश्च अभिलेखाची तपासणी करून मागितलेली माहिती १५ दिवसांच्या आज अर्जदार यांना पुरवावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, सदरचा अर्ज उपवनसंरक्षक डहाणू यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आला. तथापि तक्रारकर्ता यांनी या आदेशाविरूध्द मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालय यांचेकडील प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी(नियोजन), ठाणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१४/७/२०२१ च्या आदेशामध्ये असा निष्कर्ष काढला की, अर्जदार यांनी मागितलेला दस्ताऐवजाची नस्ती अभिलेखामध्ये असणे अपेक्षित आहे. तरी पुनश्च

अभिलेखाची तपासणी करून मागितलेली माहिती १५ दिवसांच्या आज अर्जदार यांना पुरवावी. या आदेशानंतर देखील आपणास अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही असे तक्रारकर्ता यांचे म्हणणे आहे.

तक्रारकर्ता यांनी पुढे असेही निवेदन केले की, ते जी माहिती मागत आहेत ती डहाणू वनविभागाने महाराष्ट्र खाजगी वने कायदा १९७५ अंतर्गत सूट मिळण्यासाठी कलम ६ आणि २२ अन्वये मुक्त करण्यासाठी जे प्रस्ताव पाठविले आहेत ते प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर झालेले नाहीत. तथापि त्यानंतर उपवनसंरक्षक ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील कावेळसर या गावाचा अशाच प्रकारचा प्राप्त प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालयाने केंद्र शासनास पाठविला होता व त्यास मंजूरी देखील मिळाली आहे. तथापि त्यापूर्वी उपवनसंरक्षक डहाणू कार्यालयाने सादर १४ प्रस्तावावर कोणतीच कार्यवाही केली नाही. हे सिध्द करण्यासाठी आपणास माहितीची आवश्यकता आहे.

तक्रारकर्ता यांनी पुढे असेही म्हटले की, जर सद्यस्थितीत सदरची कागदपत्रे मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालयात आढळ होत नसतील तर ते मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडून प्राप्त करून देऊ शकतात तथापि यासंदर्भात त्यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही.

तक्रारकर्ता यांचे निवेदन व प्रथम अपील आदेश बघता मागणी केलली माहिती मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालयातच प्राप्त होऊ शकते. यानुसारच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिला परंतु त्यावर कार्यवाही झालेली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे तक्रारकर्ता यांना उपलब्ध करून द्यावयाची माहिती १५ दिवसात विनामूल्य जलद टपालाने उपलब्ध करून द्यावी. सदर माहिती मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालयात उपलब्ध होत नसल्यास ज्या कार्यालयात उपलब्ध होणेची शक्यता आहे, तेथून ती प्राप्त करून घेवून तक्रारकर्तास मुदतीत पुरवावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती प्रतिक्षा किशोर नवले, वनक्षेत्रपाल (जंकास) ठाणे, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे कार्यालय यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २५/३/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१३/१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ डिसेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती प्रतिक्षा किशोर नवले, वनक्षेत्रपाल (जंकास) ठाणे **– यांना प्रत** --

--विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (जंकास) ठाणे,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे कार्यालय,
मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया,
कोपरी, ठाणे पूर्व जि.ठाणे ४०० ६०३. **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी)